# मताधिकाराच्या अधिकारासाठी अमेरिकेची सफर

## दोन मताधिकारवादी, एक मांजरीचे पिल्लू आणि दहा हजार मैल





लेखक: मारा रोक्लिफ,
चित्रे हॅडली हूपर,
मराठी: वंदना पलसाने

प्रिय वाचक,



तुम्ही मताधिकारवाद्यांबद्दल कधी ऐकले आहे का? नसेल ही ऐकले. म्हणूनच तुम्ही हे पुस्तक वाचताय याचा मला इतका आनंद होतो आहे ना! मताधिकारवादी आणि त्यांचे अमेरिकेच्या इतिहासातील महत्व, याबद्दल आज तुम्ही बरेच काही समजून घेणार आहात.

आता बघा हं, मताधिकार म्हणजे मतदानाचा अधिकार. शंभर वर्षांपूर्वी अमेरिकेमध्ये सर्वांना हा अधिकार नव्हता बरं का! बऱ्याच ठिकाणी पुरुषांना मतदानाचा अधिकार होता पण स्त्रियांना नव्हता. हे किती अयोग्य आहे ना? तेव्हा मग पाच दशलक्ष लोक (जे स्वत:ला मताधिकारवादी म्हणवत) एकत्र आले. त्यांनी स्त्रियांना, त्या केवळ स्त्रिया आहेत म्हणून कुणी त्यांना मत देण्याचा अधिकार नाकारू नये, यासाठी खूप काम केले. आणि शेवटी १९२० साली त्यांना यश मिळाले.

या पुस्तकात तुम्हाला एक छोटे सॅक्सन नावाचे मांजरीच्या पिल्लू आणि नेल आणि एलीस नावाच्या दोन मताधिकारवादी स्त्रियांची गोष्ट ऐकायला मिळणार आहे. नेल आणि एलीस यांनी सॅक्सन सोबत देशभर प्रवास केला. दोघींनी १९१६ मध्ये एका पिवळ्या गाडीतून (पिवळा रंग होता ना मताधिकारवाद्यांचा!) हा प्रवास केला आणि वाटेत स्त्रियांच्या मत देण्याच्या अधिकाराबद्दल त्या अनेक लोकांशी बोलल्या. हा एक भला मोठा लांबलचक प्रवास होता पण अगदी अनमोल होता. आज, नेल आणि एलीस सारख्या अनेक निर्भय मताधिकारवाद्यांमुळे अमेरिकेतील स्त्रिया मतदान करू शकत आहेत, कोणत्याही पदासाठी निवडणूक लढवू शकत आहेत (माझ्याप्रमाणे), त्यांना हवे ते करू शकत आहेत, हवे ते बनू शकत आहेत!

मी आशा की करते की तुम्ही सुद्धा नेल आणि एलीस प्रमाणे साहसी बनाल, निर्भय आणि धाडसी बनाल. आणि सर्वात जास्त महत्वाचे, मी आशा करते की तुम्ही कधीही आपले स्वत्व सोडणार नाही!

सिनेटर बार्बरा मिकुल्स्की (सेवानिवृत्त)

अमेरिकन कॉंग्रेसमध्ये सर्वाधिक काळ कार्यरत महिला सिनेटर


# मताधिकाराच्या अधिकारासाठी अमेरिकेची सफर

## दोन मताधिकारवादी, एक मांजरीचे पिल्लू आणि दहा हजार मैल


लेखक: मारा रोक्लिफ,

चित्रे हॅडली हूपर,

मराठी: वंदना पलसाने



एप्रिल ६, १९१६ रोजी एक छोटी पिवळी गाडी न्यूयॉर्क शहरातून निघाली. तिच्यामध्ये होती अवजारे, गाडीचे स्पेअर पार्ट, एक छोटुकला टाईप राईटर, पिटुकले शिवणयंत्र, आवश्यक सामानांनी भरलेली एक मजबूत चामड्याची ट्रंक, दोन हसऱ्या स्त्रिया, आणि गळ्याभोवती पिवळी रिबीन बांधलेले एक लहानसे काळे मांजरीचे पिल्लू!

दोघींपैकी उंच स्त्री होती नेल रिचर्डसन आणि लहानशी जी होती तिचे नाव होते एलीस बर्क. त्यांनी एकत्र अमेरिकेतील सर्व ठिकाणी प्रवास करण्याचे नियोजन केले होते. अमेरिका मोठा देश आहे, पण तितकेच किंबहुना त्याहूनही मोठे होते त्यांच्या या प्रवासाचे उद्दिष्ट!



“स्त्रियांसाठी मताधिकार!” एलीसने पत्रकारांना सांगितले.

“स्त्रियांसाठी मताधिकार!” नेलने सहमती दर्शवली.






त्या म्हणाल्या की टाईप राईटर आणि शिवणयंत्र हे त्यांच्या नियोजनाचाच भाग आहेत. जर कुणी म्हणलेच की स्त्रियांना मतदान करण्याइतपत बुद्धी नाही तर नेल तिथल्या तिथे एक कविता रचे, हे सिद्ध करायला की त्यांच्यापाशी बुद्धी आहे.

जर कुणी म्हणाले की त्यांनी स्वयंपाक करावा, शिलाई करावी आणि देश चालवण्याचे काम पुरुषांना करू द्यावे, तर नेल लगेच एक एप्रन हवेत उंच उडवी आणि एलीस एक भाषण देऊन टाके, हे सिद्ध करायला की त्या दोन्ही कामे अगदी छान करू शकतात.



आणि जर त्या दोघी दहा हजार मैल खाच-खळग्यांच्या, चिखल-मातीच्या, नकाशात बेपत्ता असणाऱ्या अज्ञात रस्त्यांवरून, अनेक संकटे आणि धोक्यांचा सामना करत, आपल्या छोट्याशा पिवळ्या गाडीतून संपूर्ण अमेरिकेची गोल चक्कर मारू शकत असतील, फक्त एकमेकींच्या सोबतीने (आणि अर्थात छोट्या मांजरीच्या पिल्लाच्या ही), तर निश्चितच हे सिद्ध होते की स्त्रिया काहीही करू शकतात.

तर, अशा प्रकारे नेल आणि एलीस प्रवासाला निघाल्या.

पहिल्याच दिवशी, त्यांना त्यांच्या पहिल्या वहिल्या साहसाचा सामना करावा लागला. एका बग्घी ओढणाऱ्या घोड्याने एका अरुंद रस्त्यावरून बाजूला होण्यास स्पष्ट नकार दिला. आता गाडी पुढे न्यायची कशी?



मग नेलने घोड्याच्या कानाला स्त्रियांसाठी मताचा अधिकारवाले पिवळे डॅफोडील बांधले.

घोडा बाजूला झाला आणि त्याने छोट्या पिवळ्या गाडीला जाण्यासाठी रस्ता मोकळा केला.



फिलाडेल्फिया मध्ये, दोघी गाडीच्या सीट्स वर चढल्या आणि तिथे उभे राहून त्यांनी शहरातील गर्दी समोर भाषणे केली.


स्त्रिया आणि पुरुषांनी टाळ्या वाजवून त्यांना प्रोत्साहन दिले.

पण, पुढच्या सकाळी मात्र....



मोठ्ठे बर्फाचे वादळ आले.

नेल आणि एलीस यांनी प्रचंड वेगवान वाऱ्यातून आणि बर्फाच्या भोवऱ्यातून बाल्टीमोर पर्यंत प्रवास केला.



तिथे त्या एका चांगल्याच भपकेदार मेजवानी मध्ये सन्माननीय अतिथी म्हणून, जेमतेम वेळेत पोचल्या.

दुसऱ्या दिवशी, जेव्हा त्या पेट्रोल भरायला थांबल्या तेव्हा पुरुषांच्या एका गर्दीने त्यांच्या छोट्या पिवळ्या गाडीला घेरले.

एलीस लगेच भाषण द्यायला आपल्या सीटवर चढली.

पण तिचे बोलणे कुणीच ऐकत नव्हते.

मग तिने त्यांना आपल्या गाडीबद्दल सर्व काही सांगितले.



“स्त्रियांसाठी मताधिकार!” सगळे पुरुष म्हणाले. आणि जेव्हा नेल आणि एलीस निघाल्या तेव्हा त्यांनी हात हलवून हलवून त्यांना निरोप दिला.

वाशिंगटन डी.सी. ला छोटीशी भेट देऊन त्या आता पर्यंत लागलेल्या सर्वात जास्त खड्डे आणि चिखल असलेल्या रस्त्यापाशी आल्या. छोटी गाडी खड्ड्यांवरून उडाली, तिने विविध प्रकारचे आवाज आणि चित्कार केले आणि शेवटी, चिखलात रुतली.





भिजलेल्या अवस्थेत, थंडीने कुडकुडत त्या एकमेकींना मिठी मारून सूर्य उगवे पर्यंत बसून राहिल्या. सकाळी दोन मजबूत खेचरांनी त्यांची गाडी चिखलातून बाहेर ओढून काढली.



आणि ती खेचरं जवळजवळ एका मोठ्ठ्या खड्ड्यात पडलीच, जिथे पूर्वी एक पूल होता.



नंतर आले पाण्याने भरलेले अजून खोल खोल खड्डे




चिकट चिकट माती

आणि जाड, ओली वाळू!



दक्षिण कॅरोलिनात त्यांचे स्वागत करायला पूर्ण गाव लोटले आणि त्यांना पिवळ्या रंगाचे पदार्थ असलेल्या जेवणाची मेजवानी दिली.



जॉर्जिया मध्ये त्या एका सर्कस परेड मध्ये सहभागी झाल्या.





सगळीकडे त्यांना गर्दी भेटत होती.

सगळीकडे, नेल आणि एलीस सांगत होत्या:
“स्त्रियांसाठी मताधिकार!”

गल्फपोर्ट, मिसिसिपीच्या बाहेर, अखेर त्यांच्या छोट्या गाडीसमोर चिखलाचा असा एक खोल खड्डा आला की त्याला पार करणे तिला अशक्य झाले.

मग त्यांनी मांजरीच्या पिल्लाला लपवून ट्रेन मध्ये चढवले...



आणि अगदी गुपचूप
न्यू ऑर्लिन्स मधल्या
एका हॉटेलात पण नेले.



तिथे त्यांची छोटी गाडी आली आणि त्या आपल्या प्रवासाला पुढे निघाल्या.



त्यांनी रिओ ग्रान्दे येथील गोळीबारापासून स्वतःचा बचाव केला.

न्यू मेक्सिकोच्या
वाळवंटातून गाडी
नेली...



आणि ॲरिझोनामध्ये अनेक
दिवस हरवून गेल्या ....


शेवटी त्या पोचल्या ...

## कॅलीफोर्नियाला !

जिथे संपूर्ण अमेरिकेचा एवढा मोठा प्रवास केल्याबद्दल त्यांनी मेडल जिंकले.



मात्र अजून त्यांना बरेच
मैल प्रवास करायचा होता,
अजून अनेक साहसांचा
सामना करायचा होता.



३० सप्टेंबर, १९१६ रोजी त्या छोट्या पिवळ्या गाडीने पुन्हा न्यूयॉर्क शहरात प्रवेश केला,

तेव्हा तिच्यात होता चिखल आणि धूळ, आणि सह्या आणि स्मृती चिन्हे आणि होत्या दोन हसऱ्या (आणि उन्हाने काळवंडलेल्या) स्त्रिया आणि एक पूर्ण वाढलेले मांजर.

इथे त्यांचे अभूतपूर्व स्वागत झाले...



आणि एक भला मोठ्ठा
पिवळा केक कापला गेला.




खड्डे, खळगे, चिखल आणि नकाशातही नसलेल्या अज्ञात दहा हजार मैलांच्या प्रवासानंतर नेलने आता  विश्रांती घ्यायची ठरवली.



आणि एलीस?

ती तशीच मागे फिरली आणि तिने पुन्हा देशाची सफर सुरु केली.

या वेळी मात्र तिने रेल्वेने प्रवास केला.



## ते नवे मशीन !

१९०० च्या सुरुवातीला असे साहसी लोक खूप कमी होते जे स्वत: गाडी चालवून अमेरिकेची सफर करण्याचा विचार सुद्धा करतील. हे करणारे पहिले यशस्वी होते वरमोंटचे एक डॉक्टर एच. नेल्सन जॅक्सन. त्यांनी १९०३ मध्ये गाडीने कॅलीफोर्निया ते न्यूयॉर्क प्रवास केला. सहा वर्षांनी न्यू जर्सीच्या एलीस रामसे या हा प्रवास करणाऱ्या पहिल्या महिला ठरल्या. पण यापैकी कुणीही एलीस बर्क आणि नेल रिचर्डसन यांनी १९१६ मध्ये केलेल्या प्रवासाच्या निम्मे अंतर सुद्धा कापले नव्हते. या जोडीने रोज दिवसा गाडी चालवली आणि रात्री सार्वजनिक भाषणे दिली.

१९१६ पर्यंत चार चाकी गाड्या बऱ्याच लोकप्रिय झाल्या होत्या, पण गाडी चालवणे अजूनही एक आव्हानच होते. पेट्रोल पंप खूप कमी होते. त्यामुळे नेल आणि एलीसला कुठल्या तरी खेड्या-पाड्यातल्या एखाद्या दुकानात किंवा शेतावर पेट्रोल भरून घ्यावे लागे. नकाशांऐवजी “निळ्या पुस्तका” वर अवलंबून राहावे लागे. त्यामध्ये “पिवळ्या धान्याच्या गोदामानंतर उजवीकडे वळा” अशा प्रकारचे निर्देश असत. मात्र जर गोदाम पडून गेले असेल किंवा मधल्या काळात त्याला लाल रंग दिला गेला असेल तर या निर्देशांचा फारसा उपयोग होत नसे.

नेल आणि एलीस यांनी सॅक्सन मोटर कार कंपनीने बनवलेली छोटी, हलकी, कमी अंतर चालवण्यासाठी योग्य अशी गाडी वापरली होती. त्यांनी तिचे नाव “गोल्डन फ्लायर” ठेवले होते. न्यूयॉर्क शहर सोडण्यापूर्वी मताधिकार नेत्या कॅरी चॅपमन कॅट यांनी पेट्रोलने भरलेली शॅम्पेन बॉटल उघडून हे नामकरण औपचारिक केले. वर्तमानपत्रांनी नंतर लिहिले की कॅट यांनी ही बॉटल इतकी जोरात खाली आपटली की गाडीच्या रेडीएटरलाच पोचा पडला.

एलीस गाडीला “यलो बेबी” सुद्धा म्हणत असे. आणि ती किती चांगली चालते याबद्दल फुशारक्या मारत असे. “छोटी बेबी मोटार कार पूर्ण प्रवासात आमची सच्ची सोबतीण राहिली,” एलीसने लिहिले. “जर कधी ती चिखलात रुतून बसली तर तिला दोष नाही देता येणार”. त्यांनी छोट्या मांजरीचे नाव सुद्धा सॅक्सन ठेवले. या बदल्यात, सॅक्सन कंपनीने नेल आणि एलीसना आपल्या जाहिरातीत वापरले. सगळ्या जाहिरातींप्रमाणे, इथेही अर्थात अतिशयोक्ती केली की दोन्ही प्रवासी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी इतक्या वेगाने पोचत की “त्यांना एकदा ही उशीर झाला नाही”.

*“काल आम्ही हळू-हळू एका पांढऱ्या रंगाच्या खेचराच्या दिशेने गेलो. तो एक लांब वॅगन ओढत होता. तो तेव्हा अगदी शांत दिसत होता. मात्र अचानक तो आपल्या उजवीकडे वळला आणि त्याने रानटी वेगाने तिथल्या पाच फूटी बंधाऱ्यावरून उडी मारली. एका क्षणासाठी आम्हाला त्या म्हाताऱ्या पांढऱ्या खेचराचे दर्शन झाले. त्याचे कान वाऱ्याने मागच्या दिशेला उडत होते, शेपटी सरळ रेषेत मागे उडत होती आणि हवेत एक लांब, हडकुळी बग्घी होती.... आणि मग ते खेचर, ती बग्घी आणि ड्रायव्हर उजवीकडे वरच्या बाजूला जोरात जमिनीवर आपटले. इतर कुणाला विशेष काही झाले नाही, फक्त  किंग्स इंग्लिशचे थोडे नुकसान झाले जेव्हा ड्रायव्हरने खेचराबद्दल त्याला नेमके काय वाटते ते सांगितले.”*

एलीस एस. बर्क

“गोल्डन फ्लायरची डायरी”, बोस्टन ग्लोब, एप्रिल २२, १९१६

## मताधिकार जिंकणे

एलीस आणि नेलचा प्रवास आपल्याला अतिशय लांब आणि अवघड वाटू शकतो, पण अमेरिकन स्त्रियांनी मताधिकार जिंकण्यासाठी केलेल्या अनेक वर्षांच्या अवघड प्रवासाच्या तुलनेत हा प्रवास जलद आणि सोपा होता.

१७७६ मध्ये, भविष्यातील प्रथम महिला (फर्स्ट लेडी) एबीगेल एडम्स हीने आपल्या क्रांतिकारी नवऱ्याला, जॉनला, पत्र लिहिले आणि "स्त्रियांची आठवण ठेवण्या"चा आग्रह केला. त्या म्हणाल्या की अमेरिकन स्त्रिया सुद्धा अमेरिकन पुरुषांप्रमाणेच स्वातंत्र्यासाठी आणि शासनामध्ये हस्तक्षेपासाठी लढू इच्छितात. जॉन एडम्सनी उत्तर लिहिले, "यावर मी फक्त हसू शकतो." लवकरच, त्याने स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्यावर सही केली, ज्यात लिहिले होते, "सर्व (पुरुष) माणसांना समान बनवले गेले आहे." स्त्रियांना वगळले गेले होते.

१८४८ मध्ये, एलिझाबेथ केडी स्टॅनटन आणि ल्युक्रेशिया मॉट यांचा सहभाग असलेल्या एका स्त्रियांच्या गटाने न्यूयॉर्क मधील सेनेका फॉल्स येथे एक सभा घेतली. तिथे, त्यांनी त्यांचा स्वत:चा एक जाहीरनामा प्रसिद्ध केला, ज्यात लिहिले होते, "सर्व पुरुष आणि स्त्रिया यांना समान बनवले गेले आहे." परंतु, त्यांना हे ही माहीत होते की कायद्याअंतर्गत स्त्रियांना समान बनवण्यासाठी, मताधिकार जिंकणे आवश्यक होते.

एबिगेल एडम्सने स्त्रियांच्या हक्कासाठी आवाज उठवण्याला बहात्तर वर्षे उलटून गेली होती. तिचे ध्येय साध्य होण्यासाठी अजून नेमकी तेवढीच म्हणजे बहात्तर वर्षे लागणार होती.

ज्या स्त्रियांनी आणि काही पुरुषांनी हा लढा दिला, त्यांना मताधिकारवादी म्हणून ओळखले गेले. (मताधिकाराचा अर्थ आहे मत देण्याचा अधिकार). मॉट आणि स्टॅनटन यांच्या बरोबर यामध्ये ल्युसी स्टोन सारख्या नेत्या सुद्धा सामील होत्या. त्याचबरोबर सुझन बी. अँथनी, सोजोर्नर ट्रुथ, एलीस पॉल आणि इडा बी. वेल्स यांनीही त्यांचे नेतृत्व केले. या सगळ्यांच्यात नेल रिचर्डसन आणि एलीस बर्क सारख्या असंख्य ज्ञात-अज्ञात नायिका होत्या.

या स्त्रियांनी रस्त्यांवर निदर्शने करण्यासाठी आणि भाषणे देण्यासाठी आपल्या पती आणि पित्यांची अवज्ञा केली. (एलिसने, सहा महिने, रोज रात्री न्यूयॉर्क शहरातील ब्रॉडवे आणि ९६व्या रस्त्याच्या कोपऱ्यावर एका लाकडी खोक्यावर उभे राहून येणाऱ्या-जाणाऱ्यांबरोबर हसत-हसत भांडणे केली.)

जशी जशी वर्षे पुढे गेली, मताधिकारवादी अजून सर्जनशील बनले. त्यांनी गाणी लिहिली. कार्टून्स बनवली. एका वैमानिक मताधिकारवाद्याने विमानातून कार्निवल मधल्या गर्दीवर पत्रकांचा 'बॉम्ब' टाकला. अजून एकाने, कोळसा खाणकामगारांपर्यंत पोचण्याच्या हेतूने संरक्षणात्मक हेतूसाठी असलेला पोशाख घातला आणि जमिनीखाली २५०० फूट गेली. मताधिकारवाद्यांनी स्टॅच्यू ऑफ लिबर्टी ला सुद्धा बोलायला लावले. अर्थातच जे शब्द पुतळ्याच्या तोंडून बाहेर आले, ते होते "स्त्रियांना मताधिकार!"

साल १९१६ खूपच रोमांचकारी होते. मोन्टानाची जेनेट रँकीन कॉंग्रेस मध्ये निवडली गेलेली पहिली महिला सिनेटर ठरली. मोन्टाना त्या अकरा पश्चिमी राज्यांमधले एक होते जिथे स्त्रियांनी मताधिकार जिंकला होता. या वर्षी अमेरिकेच्या अध्यक्षपदाची निवडणूक सुद्धा असणार होती. त्यामुळे मताधिकारवाद्यांनी दोन्ही पक्षांचे स्त्रियांच्या मताधिकाराविषयी मन वळवण्यासाठी जोरदार निदर्शने करण्याचे ठरवले. शिकागोत रिपब्लिकनांच्या संमेलनामध्ये, हजारो स्त्रिया आणि मुलींनी रबराचे ब्लँकेट पांघरलेल्या हत्तीच्या छोट्या पिल्लाच्या मागे, ज्यावर लिहिले होते “स्त्रियांना मताधिकार”, गोठवणाऱ्या पावसात निदर्शने केली. पुढच्या आठवड्यात, सैंट लुईस मध्ये, त्यांनी “वॉकलेस परेड” चे आयोजन केले. तिथे डेमोक्रॅटिक पक्षाच्या संमेलनासाठी जाणाऱ्या पुरुषांना एक मैल दोन्ही बाजूंनी शांतपणे उभ्या असलेल्या आठ हजार मूक मताधिकार कार्यकर्त्यांच्या मधून चालत जावे लागले.

हे निदर्शक देशातील सर्व भागांमधून आले होते. अनेकांना या योजनांबद्दल नेल आणि एलीस कडून समजले असेल, ज्यांनी हा संदेश देशभर पोचवण्यासाठी देशाची परिक्रमा केली होती. संमेलनांच्या वेळी ही जोडी नुकतीच कॅलीफोर्निया मध्ये पोचली होती. यानंतरही त्या थांबल्या नाहीत. त्यांना माहीत होते की त्यांचे कार्य अजून संपले नाही.

पुढच्या वर्षी, अमेरिकेने पहिल्या महायुद्धात प्रवेश केला. तेव्हा अनेक मताधिकारींनी युद्धामध्ये सहयोग देण्यासाठी आपल्या स्वत:च्या उद्दिष्टांना बाजूला ठेवले. इतर काहींनी, एलीस पॉल यांच्या नेतृत्वात, आपली लढाई चालू ठेवली. त्यांनी व्हाईट हाउस मध्ये धरणे आंदोलन केले. त्यांनी राष्ट्रपती वूड्रो विल्सन यांना प्रश्न केला की त्यांना परक्या देशातील लोकशाही आपल्या देशातील लोकशाही पेक्षा अधिक महत्वाची का वाटते? गर्दीने शांतपूर्ण निदर्शने करणाऱ्या निदर्शकांवर हल्ले केले, तरी पोलीस कोणतीही कृती न करता मूक राहिले. एवढेच नाही तर यानंतर पोलिसांनी निदर्शकांनाच, ज्यांनी कोणताही कायदा मोडला नव्हता, अटक करण्यास सुरुवात केली. तुरुंगात स्त्रियांसोबत अतिशय वाईट वर्तन केले गेले पण या स्त्रियांनी अत्यंत धाडसाने त्याचा विरोध केला. यामुळे जनतेचे मत बदलले आणि अमेरिकन जनतेनेच आता स्त्रियांच्या मताधिकाराची मागणी केली.

1920 मध्ये, अमेरिकेच्या संविधानामध्ये एकोणिसावी दुरुस्ती अधिकृतपणे जोडली गेली. त्यात म्हटले होते, “युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिकेच्या नागरिकांना युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका किंवा कोणते ही राज्य, लिंग (सेक्स) या कारणामुळे, मतदानाच्या अधिकारापासून वंचित ठेवू शकणार नाही.”

या प्रकारे, अखेर, अमेरिकन स्त्रियांना मतदानाचा अधिकार मिळाला.